# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

स्टेशन रोड, सदर, नागपूर – ४४०००१.
फोन नं. २५३३२०२,पी.बी.एक्स.नं. २५३१४३१, २५३१४३२, फॅक्स नं. ०७१२ २५३१४३१

क्रमांक :– नामक्षे/नरयो/उसंनर(नामप्रविप्रा)/2410 नागपूर, दिनांक: 16/03/२०१९

## आदेश

**विषय :–** विकास नियंत्रण व प्रोत्साहान नियमावली –२०१८, नियम क्र. २५.१५ मध्ये **Additional Use** म्हणून विकास योजनेनुसार **"कृषी"** या उपयोगाकरीता प्रस्तावित जागेवर **"वृध्दाश्रम (Old Age Home)"** हा वापर अंतर्भुत करण्याबाबत.

**संदर्भः–** १) या कार्यालयाचे पत्र क्रमांक नामक्षे/नरयो/उसंनर(नामप्रविप्रा) दि. १३/०२/२०१९

२) सहसंचालक नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्रमांक म.वि.नि.नि./ओल्ड एज होम/सहसंचानाग/२४६ दि. १६/०२/२०१९

ज्याअर्थी, शासनाने दि. ०६/०५/२००० ला प्रादेशिक विकास योजना व प्रादेशिक विकास नियंत्रण नियमावली मंजुर केली असुन प्रादेशिक योजना, **नागपूर प्रदेशाकरीता परिशिष्ट "क्ष" (एक्स)** मध्ये भाग–१ मधील विभाग क्र.४ मधील शेती खालील/अविकसित क्षेत्र या मध्ये अनूज्ञेय असलेले वापर मधील अनु.क्र. १५ मध्ये पुढील बाब नमुद आहे,

**"पंजिबध्द सार्वजनिक व धर्मार्थ संस्थ ज्या मुख्यतः समाज सुधारणा, ग्रामीण विकास, सार्वजनिक स्वास्थ, शिक्षण व धर्मार्थ कामात कार्यरत आहेत. उदा. अनाथाश्रम, वृध्दाश्रम, गिर्यारोहण संस्थ इ. अनुज्ञेय आहे. असे बांधकाम सुयोग्य ठिकाणी बांधकामाखालील क्षेत्र भुखंड क्षेत्राच्या १/५ पेक्षा जास्त नसावे तसेच बांधकाम फक्त तळमजला व त्यावर मजला पुरतेच मर्यादित असावे. दर आर क्षेत्राकरीता चार या दराने वृक्षारोपण करण्यात यावे",**

ज्याअर्थी, दि. ०५/०१/२०१८ रोजी शासनाने मंजुर केलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. **25.15** मध्ये **Additional Uses :– "The list of uses mentioned under the various land use zoing herein above at regulation No. 25.2 to 25.7 may be ameneded by the Metropolitan Commissioner from time, with consultant of Divisional Head of Town Planning Department"** अशी तरतूद आहे,

ज्याअर्थी, या कार्यालयाने पत्र क्रमांक नामक्षे/नरयो/उसंनर(नामप्रविप्रा) दि. १३/०२/२०१९ अन्वये सहसंचालक नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांचा अभिप्राय सादर करण्यास कळविले असता सहसंचालक नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांनी पत्र क्रमांक म.वि.नि.नि./ओल्ड एज होम/सहसंचानाग/२४६ दि. १६/०२/२०१९अन्वये कळविले की, व्यापक जनहिन दृष्टीकोन विचार घेउन समाज सुधारणेच्या दृष्टीने वृध्दाश्रम हा वापर शेती

विभागात उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे व तसेच बांधकाम नियमानुसार करण्याचे अटीवर **"वृध्दाश्रम (Old Age Home)"** वापर अनुज्ञेय करण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

आणि त्याअर्थी, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली –२०१८, नियम क्र. २५.१५ मध्ये **Additional Use** म्हणून विकास योजनेनुसार **"कृषी"** या उपयोगाकरीता प्रस्तावित जागेवर **"वृध्दाश्रम (Old Age Home)"** हा वापर अंतर्भुत करण्यात येत आहे.

12.03.19

महानगर आयुक्त,
**नागपूर महानगर प्रदेश विकास प्राकधिकरण,**
नागपूर.

प्रतिलीपी :–

१. मा. प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई–४०० ०३२
२. मा. संचालक नगररचना, महाराष्ट्र शासन, मध्यवर्ती कार्यालय, पूणे.
३. सहसंचालक नगररचना, नागपूर विभाग, जुने सचिवालय, सिव्हील लाईन, नागपूर.
४. सहाय्यक संचालक नगररचना, नागपूर विभाग, प्रशासकिय इमारत, दुसरा माळा, सिव्हील लाईन, नागपूर.